*Annexure XIIB (5), (Vide Article - 12.05)*

महाराष्ट्र अनुसूचित जमातीच्या भोगवटदारांच्या
झाडांची विक्री करण्याबाबत [नियमन] अधिनियम १९६९
अंमलबजावणीबाबत..

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक: टिआरएस-१०९३/सीआर-२९१/फ-३
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २७ मार्च, १९९६.

पहा:-

१] शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्रमांक टिआरएस-१०८१/१२०१६३/फ-३, दिनांक २२ जुलै, १९८२.

२] शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्र. एफएलडी-३६९१/प्र. क्र.४३२/फ-३, दिनांक १८ मार्च, १९९२.

३] शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्र. एफएलडी-३६९१/प्र. क्र. ४३२/फ-३, दिनांक ५ ऑक्टोबर, १९९५.

४] महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक ६, दिनांक ८ जानेवारी, १९९६.

५] महसूल व वन विभाग पत्र क्र. टीआरएस-१०९३/प्र. क्र. २९१/फ-३, दिनांक १६ जानेवारी, १९९६.

शासन निर्णय:

शासन परिपत्रक क्रमांक टीआरएफ-१०८१/१२०१६३/फ-३, दि. २२ जुलै, १९८२ सोबतच्या आदेशाद्वारे अनुसूचित जमातीच्या भोगवटदाराच्या झाडांची वन अधिकाऱ्यां-मार्फत अधिनियमाच्या [महाराष्ट्र अनुसूचित जमातीच्या भोगवटदारांच्या झाडांची विक्री अधिनियम [१९६९] कलम ६ [तीन] प्रमाणे विक्री करणेबाबत अधिनियम व नियमांची अंमलबजावणी करण्याची पध्दत निश्चित केलेली आहे. त्यानुसार खातेदाराच्या मालाची विक्री झाल्यानंतर खर्च वजा जाता विक्रीची रक्कम अदा करणेबाबतची पध्दत सदर आदेशात नमूद करण्यात आलेली आहे. खातेदारांच्या झाडांची तोड करुन माल विक्री डेपोवर आणल्यानंतर झाडांची अंदाजे दर्शनी किंमत ठरवून खर्च वजा जाता मालाची ५० टक्के रक्कम खातेदारास अदा करण्याचे आदेशात स्पष्टपणे नमूद केले होते. परंतु खातेदारांना झाडांच्या विक्रीची किंमत लवकर मिळत नाही, त्यामुळे वन विभागामार्फत झाडांची विक्री करणेबाबत खातेदारामध्ये नाराजी असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. खातेदाराला त्यांच्या झाडांच्या विक्रीचा अर्ज केल्यानंतर वन विभागाने तातडीने रक्कम अदा करणेबाबत शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

क्र. मा. प. . . . २

२. अनुसूचित जमातीच्या भोगवटदारांच्या झाडांची विक्री करण्याबाबत [नियमन] अधिनियम १९६९ च्या कलम ६[२] प्रमाणे झाडांची विक्री करण्याचे ठरविण्यात आले असेल तेव्हा झाडांची मोजणी करून शासन आदेश क्रमांक टीआरएस-१०८१/१२०१६३/फ-३, दि. २२ जुलै, १९८२ प्रमाणे विक्रीची कार्यवाही करावयाची आहे. त्याप्रमाणे सदर आदेशातील भाग-एफ[४] अधील तरतुदीप्रमाणे झाडांची तोड करून मालाची विक्री डेपोवर वाहतूक केल्यानंतर खर्च वजा जाता मालाच्या दर्शनी किंमतीच्या ५० टक्के रक्कम देण्याची तरतूद होती. आता यापुढे अनुसूचित जमातीच्या भोगवटदारांना त्यांच्या झाडांचा व त्यांच्या फांद्यांच्या विक्रीच्या रकमा अदा करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी, असा शासनाने निर्णय घेतलेला आहे.

१] अधिनियम व नियमाच्या तरतुदीप्रमाणे खातेदारांच्या झाडांच्या विक्रीकरीता सहाय्य देण्यासंबंधीच्या निर्णयाच्या तारखेपासून ३० दिवसांचे कालावधीत उभ्या झाडांच्या निव्वळ अंदाजित किंमतीच्या २० टक्के रक्कम खातेदाराला अग्रिम म्हणून अदा करण्यात यावी.

२] खातेदारांची झाडे तोडल्यानंतर माल तयार करून विक्री डेपोवर आणल्यापासून ३० दिवसाचे कालावधीत दुसरा अग्रिम म्हणून निव्वळ अंदाजित किंमतीच्या ३० टक्के रक्कम अदा करण्यात यावी.

३] माल विक्री डेपोवर आणल्यापासून १२० दिवसाच्या कालावधीत उपरोक्त अग्रिमाची रक्कम व खर्च वजा जाता विक्री पासून प्राप्त झालेल्या एकूण रकमेपैकी बाकीची रक्कम खातेदाराला अदा करण्यात यावी.

३. अनुसूचित जमातीच्या खातेदारांच्या झाडांचा व फांद्यांचा योग्य मोबदला खात्रीपूर्वक देण्यात यावा याबाबत सर्व संबंधित अधिकारी आणि कर्मचारी यांनी योग्य ती खबरदारी घ्यावी, तसेच त्यांच्या मालाची रक्कम विहित कालावधीत देण्याची जबाबदारी पार पाडावी.

४. अनुसूचित जमातीच्या खातेदारांच्या झाडांची विक्री करण्यासाठी तत्परतेने कार्यवाही करून आदेशाचे काटेकोरपणे पालन केले जाईल याबाबत सर्व वनवृत्ताच्या वनसंरक्षकांनी दक्षता घ्यावी व संबंधित अधिकाऱ्यांना योग्य त्या सूचना द्याव्यात. सदर आदेशाचे पालन करण्यात कसूर केल्यास संबंधितांवर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, याबाबतसुध्दा स्पष्टपणे समज द्यावी.

...... ३.

५. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक डीआर-१०५/९६/व्यय-१०, दिनांक १६/३/९६ अन्वये त्या विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

गोडोतायडे

[ गो. डो. तायडे ]
कक्ष अधिकारी,
महसूल व वन विभाग.

प्रति,

प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर [५ प्रती].
मुख्य वनसंरक्षक [संधारण] महाराष्ट्र राज्य, नागपूर [५ प्रती].
मुख्य वनसंरक्षक [उत्पादन] महाराष्ट्र राज्य, नागपूर [५ प्रती].
सर्व वनसंरक्षक / सर्व उपवनसंरक्षक.
महालेखापाल-१ [लेखा परीक्षा] महाराष्ट्र राज्य, मुंबई.
महालेखापाल-१ [लेखा व अनुज्ञेयता] महाराष्ट्र राज्य, मुंबई.
महालेखापाल-२ [लेखा परीक्षा] महाराष्ट्र राज्य, नागपूर.
महालेखापाल-२ [लेखा व अनुज्ञेयता] महाराष्ट्र राज्य, नागपूर.
आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
वित्त विभाग/वीयुडी-४/व्यय-१०, मंत्रालय, मुंबई.
महसूल व वन विभाग [सर्व कार्यासने].
निवड नस्ती, फ-३ कार्यासन, महसूल व वन विभाग.